ePaper
# दोन्ही निवडणुका स्वबळावर लढण्याची भाजपची तयारी!



वर्ष - 7 । अंक -43 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पुणेकरांसाठी आनंदाची बातमी!
- जिल्ह्यात करआकारणी आता ऑनलाइन!
- कर्नाटक निकालाचे पडसाद


www.mahaenews.com | ।शुक्रवार, दि. 9 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पुणे-नाशिक महामार्गाला ‘गती’!

## »एलिव्हेटेड कॉरिडॉर’ प्रकल्प : भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून सादरीकरण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-नाशिक महामार्गावर होणाऱ्या वाहतूककोंडीतून मार्ग काढण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ची निमित्ती करण्यात येत आहे. आठ पदरी प्रशस्त महामार्ग होणार असून, आगामी ५० वर्षांतील वाढत्या वाहतुकीचा विचार करुन प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करा. मेट्रो आणि अंतर्गत रस्त्यांवर वाहतुकीचा ताण येणार नाही, याची काळजी घ्या, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून जाणारा पुणे-नाशिक महामार्गावरील भोसरी, कासारवाडी, मोशी परिसरात होणारी वाहतूक कोंडी आणि भविष्यकालीन नियोजनाबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत सादरीकरण (PRESENTATION) करण्यात आले. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, आमदार उमा खापरे, भाजपा चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महामार्गावरील नाशिक फाटा ते मोशीपर्यंत प्रशस्त आठ पदरी रस्ता होणार आहे. त्यामध्ये दोन्ही बाजूंना २ लेन सर्व्हिस रोडसह विद्यमान रस्त्याचे ४/६ लेनमध्ये सुधारणा करणे आणि सिंगल पिलरवर टायर-१ येथे ८ लेन ‘एलिव्हेटेड फ्लायओव्हर’चे बांधकाम प्रस्तावित आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून जाणाऱ्या या रस्त्यावरील नाशिक फाटा ते खेड दरम्यान २९.८१ किमी अंतरावरील ‘एलिव्हेटेड कॅरिडॉर’चे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये ८ पदरी रस्ता, मेट्रो लाईन (डबल डेकर), सर्व्हीस रोड, रॅम्प याचा समावेश आहे. सध्यस्थितीला मोशी या ठिकाणी प्रतिदिन ९६ हजाराहून अधिक वाहनांची, तर खेडमध्ये ६७ हजाराहून अधिक वाहनांची प्रतिदिन रहदारीची नोंद आहे. भविष्यातील वाढत्या रहदारीचा विचार करुन प्रकल्पाचे काम करण्यात येणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मोशीतून तब्बल ६ लाख ७० हजाराहून अधिक वाहनांची प्रतिदिन रहदारी सुलभपणे होवू शकते. खेडचा विचार केला असता प्रतिदिन ३ लाख ९७ हजाराहून अधिक वाहनांची रहदारी प्रतिदिन होईल, अशी क्षमता पुणे-नाशिक ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ची राहील, असा दावा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.

### स्थानिक प्रवाशांसाठी ‘रोड रॅम्प’ सुविधा...

**» पुणे-नाशिक महामार्गाच्या ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’चे काम पूर्ण झाल्यानंतर पुण्यावरून येणाऱ्या गाड्या विना अडथळा चाकणच्या दिशेने जाण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. नाशिक फाट्यापासून मोशीपर्यंत जाणाऱ्या स्थानिक प्रवाशांसाठी काही ठिकाणी ‘रोड रॅम्प डाऊन’ करून जाण्याची सुविधा असेल. त्याचपद्धतीने मोशीपासून नाशिक फाट्यापर्यंत येणाऱ्यासाठी अशाच सुविधा असतील. तसेच, पुणे विमानतळावरून चाकणकडे जाण्यासाठी मार्गिका राहणार आहे.**


> “ ‘व्हीजन-२०२०’ अंतर्गत पुणे-नाशिक महामार्गाच्या विकासाचा संकल्प आम्ही केला होता. कोविड आणि लॉकडाउन आणि राज्यातील सत्ताबदलामुळे मध्यंतरी प्रकल्पाचे काम संथ होते. मात्र, आता राज्यात भाजपा-शिवसेना महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे हा प्रकल्प निश्चितपणे निर्धारित वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास वाटतो. आज झालेल्या प्रेझेंटेशनमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना आगामी ५० वर्षांचा विचार करुन नियोजन करावे आणि तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करावी, अशी सूचना केली आहे.
> **- महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# नाट्यगृह, प्रेक्षागृह खासगीकरणाला विरोध

## »संभाजी ब्रिगेडचा इशारा : आयुक्तांचा डाव हाणून पाडणार

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील नाट्यगृह, प्रेक्षागृहांच्या खासगीकरणाचा घाट घातला आहे. ठेकेदारांच्या तुंबड्या भरण्यासाठी नागरिकांच्या करातून उभारलेले नाट्यगृहे खासगी केली जात आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसणार आहे. त्यामुळे नाट्यगृह, प्रेक्षागृहांच्या खासगीकरणाचा विचार करू नये, अन्यथा हा डाव हाणून पाडू, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतिश काळे यांनी दिला..**



पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदन देण्यात आले. या वेळी पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात नमूद केले आहे की, पिंपरी चिंचवड मधील नागरिकांच्या कष्टाच्या कररूपी पैशातून महापालिकेने शहर उभा केले. शहरातील नागरिक, कलावंतांना कार्यक्रम करता यावे यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करून सुसज्ज नाट्यगृहे, प्रेक्षागृहे उभारले आहेत. यामध्ये संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे सभागृह, चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, नवी सांगवी येथील निळू फुले नाट्यगृह, भोसरीतील कै. अंकुशराव नाट्यगृह निर्माण केली होती. या मध्ये आता निगडी प्राधिकरण येथील गदिमा नाट्यगृहाची भर पडली आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून ही नाट्यगृहे उभारली आहेत. या मध्ये सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात नाट्यगृह उपलब्ध करून दिले जात आहेत.

### अन्यथा महापालिकेवर आंदोलन करणार

» खासगीकरणाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लूट करण्याचा डाव महापालिकेचा आहे. या मधून ठेकेदाराचे हित जोपासले जाणार आहे. शहरातील सामाजिक, सांस्कृतिक संघटनांना कार्यक्रम घेणे मुश्कील होणार आहे. एका बाजूला करातून सुविधा देणे जबाबदारी असताना दुसरीकडे होणारी आर्थिक लूट ही सर्वसामान्य नागरिकांचा संताप वाढवणारी आहे. त्यामुळे शहरातील नाट्यगृह, प्रेक्षागृहांच्या खासगीकरणाचा विचार सोडावा. अन्यथा महापालिकेवर तीव्र आंदोलन करू, असा इशारा काळे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

# 'सारथी'ला लालफितीचा खोडा!

## परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा प्रस्ताव अडकला सरकारदरबारी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या नोव्हेंबर महिन्यात हा प्रस्ताव नियोजन विभागाकडे सादर करण्यात आला. त्यावर नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या शंकांचे निरसनही मार्च महिन्यात करण्यात आले. परंतु, नियोजन विभागाने अद्याप या प्रस्तावाला मान्यता दिलेली नाही. त्याचा फटका या शिष्यवृत्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना बसतो आहे.**

परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी मराठा समाजातील पन्नास गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची घोषणा राज्य सरकारने केली असली, तरी याबाबतचा प्रस्ताव सरकारी लालफितीत अडकला आहे. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेने (सारथी) गेल्या नोव्हेंबरमध्ये सादर केलेला हा प्रस्ताव नियोजन विभागाकडे धूळ खात पडून आहे. त्यामुळे या शिष्यवृत्तीच्या आधारे परदेशात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला आहे.

परदेशातील नामांकित विद्यापीठे व शिक्षण संस्थांमध्ये पदव्युत्तर पदवी किंवा पीएचडीचे शिक्षण घ्यायचे आहे, परंतु, घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे त्याचा खर्च कसा उचलायचा, असा प्रश्न मराठा समाजातील अनेक विद्यार्थ्यांपुढे आहे. त्याचा विचार करून मराठा समाजातील गुणवंतांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यास आर्थिक पाठबळ देण्याची घोषणा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केली. समाजकल्याण विभाग व इतर बहुजन कल्याण विभागातर्फे मागासवर्गीय घटकांतील विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. त्या धर्तीवर मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये पदव्युत्तर पदवी व पीएचडीचे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव 'सारथी'ने तयार केला.



> परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी 'सारथी'ने पाठविलेल्या प्रस्तावावर शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे यंदाच्या वर्षात उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. सरकार केवळ लोकप्रिय घोषणा करत असून, त्याची अंमलबजावणी करत नाही. त्याचा फटका गरजू विद्यार्थ्यांना बसतो आहे.
>
> **- कुलदीप आंबेकर,** अध्यक्ष, स्टुडंट्स हेल्पिंग हँड

### असा आहे 'सारथी'चा प्रस्ताव

- इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या धर्तीवर 'सारथी'चे परदेशी शिष्यवृत्तीचे धोरण.
- मराठा समाजातील पन्नास गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणार.
- शिष्यवृत्तीसाठी अर्जदार विद्यार्थी मराठा समाजातील असावा, तसेच राज्याचा रहिवासी असावा.
- या विद्यार्थ्याला पदव्युत्तर पदवी व पीएचडीसाठी क्यूएस वर्ल्ड रँकिंग दोनशेच्या आतील विद्यापीठ किंवा शिक्षण संस्थेत प्रवेश मिळाला असावा.
- या विद्यार्थ्याला पदव्युत्तर पदवीसाठी कमाल तीस लाख रुपये, तर पीएचडीसाठी कमाल चाळीस लाख रुपये वार्षिक शिष्यवृत्ती मिळणार.

> मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यास आर्थिक मदत करण्यासाठी 'सारथी'ने नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. मागास बहुजन कल्याण विभागातर्फे परदेशी उच्च शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेच्या अटी-नियमांप्रमाणे हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्याला मान्यता मिळाल्यावर मराठा समाजातील विद्यार्थ्यांचे परदेशी उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न साकार होईल.
>
> **- अशोक काकडे,** व्यवस्थापकीय संचालक, सारथी

---

# येरवडा मध्यवर्ती कारागृहाचा मोठा निर्णय!

## आता कैद्यांना कुटुंबीयांशी संवाद साधणे होणार सोप्पं

।पुणे । महाईन्यूज

**'ई-येरवडा मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांकडे मोबाइल सापडल्याच्या काही घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर कारागृह प्रशासनाने मोबाइलचा बेकायदा वापर थांबविण्याच्या दृष्टीने कैद्यांसाठी अधिकृत फोन बुथ सुविधा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात येरवडा कारागृहात प्रायोगिक तत्त्वावर ही सुविधा देण्यात येणार असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रयोग यशस्वी ठरल्यास राज्यातील सर्व कारागृहांमध्ये फोन बुथ सुरू करण्यात येणार आहेत.**



कारागृहातील कैद्यांना कुटुंबीयांशी संवाद साधता यावा, या दृष्टीने येरवडा मध्यवर्ती कारागृहात पुढील आठवड्यापासून तीस फोन बुथ सुरू करण्यात येणार आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने हा प्रयोग यशस्वी ठरल्यास फोन बुथची संख्या वाढवली जाईल; तसेच राज्यातील सर्व कारागृहांमध्ये ही सुविधा सुरू करण्यात येईल. 'मकोका' आणि गंभीर गुन्ह्यांतील कैद्यांनाही ही सुविधा देण्याचा विचार केला जाईल, अशी माहिती राज्य कारागृह व अतिरिक्त पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी गुरुवारी पत्रकारांना दिली.

### 'भेटीची वेळ वाढवणार'

'कचऱ्याच्या गाडीतून मोबाइल, अमली पदार्थांची ने-आण असे प्रकार रोखण्यासाठी आणि मोबाइल वापरातून संघटित गुन्हेगारी वाढण्याच्या शक्यतेतून कैद्यांना अधिकृतपणे फोन सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एखाद्या कैद्याकडे मोबाइल आढळला म्हणून इतरांच्या अधिकारांवर गदा आणता येणार नाही. उलट फोनची सुविधा अधिकृतपणे सुरू झाल्यास मोबाइलचा बेकायदा वापर थांबेल. फोन बुथ सुविधेबरोबरच कैद्यांच्या भेटीची वेळ वाढविण्याबाबतही निर्णय घेतला जाईल,' असे गुप्ता यांनी सांगितले.

---

# अभिमानास्पद! सासवड-जेजुरी मार्गावर महिलेने चालवली बस

। पुणे । महाईन्यूज ।



राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) इतिहासामध्ये पहिल्यांदा एका महिलेने सासवड ते नीरा मार्गावर बस चालविली. एसटीच्या प्रवाशांना सुरक्षित घरी पोहचविण्याची जबाबदारी महिलेने शिरावर घेतली. अर्चना अत्राम असे पहिली एसटी बस चालकाचे नाव आहे. त्यांनी सासवड ते नीरा (जेजुरी मार्गे) या मार्गावर गुरूवारी बस चालविली.

सायंकाळी साडेसहा वाजता अत्राम या सासवड डेपोतून निरासाठी बस घेऊन निघाल्या. त्यांनी आज पहिल्यांदाच चालक म्हणून काम केले.

अत्राम यांनी बस चालविल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता. याबद्दल राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी ट्विट करून अत्राम यांचे अभिनंदन केले.

चाकणकर आपल्या ट्विटमध्ये म्हणतात, 'नवी जबाबदारी तुझी, एसटी प्रवाशांना सुरक्षित घरी पोहोचवण्याची... आजच्या दिवशी महाराष्ट्रातील एसटीच्या इतिहासात राज्यातील पहिल्या महिला एसटी चालक मा.अर्चना अत्राम यांच्या नावाने इतिहास लिहिला गेला आहे. त्यांनी सासवड ते नीरा (जेजुरी मार्गे) या मार्गे बस चालवली आहे. राज्य महिला आयोगाच्या वतीने पहिल्या एसटी महिला चालक मा.अर्चना आत्राम यांचे मनःपूर्वक अभिनंदन.' करण्यात आले.

# शिरूर लोकसभा मतदार संघाची धुरा महेश लांडगेंच्या हाती!

## भाजपाची रणनिती : निवडणूक प्रमुखपदी जबाबदारी

। पिंपरी।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एवढ्या आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीकडून संघटनात्मक मोर्चेबांधणी करण्यात आली आहे. शिरूर लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक प्रमुखपदी आमदार महेश लांडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघाच्या प्रमुखांची घोषणा केली. त्यामध्ये लांडगे यांना शिरुरची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**



लोकसभा मतदार संघ दौऱ्याच्या निमित्ताने केंद्रीय मंत्री रेणुका सिंह, प्रल्हादसिंह पटेल यांनी गेल्या वर्षभरात शिरूर लोकसभा मतदार संघात दौरे केले आहेत. या सर्व कार्यक्रमांमध्ये लांडगे सक्रीयपणे सहभागी होते. आमदार लांडगे म्हणाले की, शिरुर लोकसभा मतदार संघातील भोसरी, खेड, जुन्नर, आंबेगाव, मंचर आणि हडपसर या सहाही विधानसभा मतदार संघांमध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून मतदार संघातील पुणे-नाशिक महामार्ग, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटन विकास, रेल्वे महामार्ग यांच्यासह विविध प्रकल्प मार्गी लावण्यात आले आहेत. ग्रामीण आणि शहरी असा मतदार निश्चितपणे विकासाच्या मुद्यांवर भाजपासोबत आहे. त्यामुळे पक्षाने दिलेली जबाबदारी सक्षमपणे निभावणार असून, पक्षाने दिलेल्या उमेदवाराला बहुमताने निवडून आणण्याचा आमचा निर्धार आहे.

विधानसभा निवडणूक प्रमुखपदी डोळस, बारणे, गोरखे दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तयारी केली असून, विधानसभा निवडणूक प्रमुखपदी नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातून माजी नगरसेवक विकास डोळस, चिंचवड विधानसभा मतदार संघातून माजी नगरसेवक काळूराम बारणे आणि पिंपरी विधानसभा मतदार संघातून अमित गोरखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### पश्चिम महाराष्ट्रातील मतदार संघांचे प्रमुख

- मावळ - प्रशांत ठाकूर
- पुणे - मुरलीधर मोहोळ.
- बारामती- राहुल कुल
- माढा- प्रशांत परिचारक
- सातारा- अतूल भोसले
- सांगली- दिपक शिंदे
- हातकणंगले- सत्यजित देशमुख
- कोल्हापूर- धनंजय महाडिक

# "हरितवारी-निर्मलवारी-प्लास्टिकमुक्त वारी" चा संकल्प!

## आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचना: पालखी सोहळ्याच्या स्वागताची तयारी

। पिंपरी । महाईन्यूज

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगदगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज झाली आहे. यंदाची वारी हरितवारी-निर्मलवारी-प्लास्टिकमुक्त वारी करण्याच्या संकल्पपुर्तीसाठी आपण कृतीशील सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.**

आषाढीवारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने स्थापत्य, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्थेबरोबरच यंदाची वारी पर्यावरणपूरक,प्लास्टिक मुक्त, हरितवारी करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले असून त्या अनुषंगाने संबंधित विभागांना तातडीने कामकाम करण्याच्या, आपसात समन्वय राखण्याच्या सूचना महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या आषाढीवारी पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने वारकऱ्यांकरिता पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवासुविधांचे आणि इतर नियोजन करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत मधुकरराव पवळे सभागृह येथे आढावा बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, ज्ञानदेव जुंधारे, संजय खाबडे, संजय कुलकर्णी, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे आणि विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



आयुक्त शेखर सिंह म्हणाले, आषाढीवारी पालखी सोहळ्यासाठी महापालिकेच्या वतीने सुक्ष्मनियोजन करण्यात आले आहे. पालखी मार्ग तसेच पालखी मुक्कामाच्या ठिकाणी नियंत्रण आणि समन्वय ठेवण्यासाठी ग्रुप कमांडर, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

### सुविधा देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न...

पालखी मुक्काम तसेच पालखी मार्गावर तात्पुरत्या विश्रांती कक्ष तयार करण्यात आले असून यामध्ये महिलांसाठी सॅनिटरी नॅपकीन व वेंडिंग मशिन ठेवण्यात आली आहे. स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्षाची सोयदेखील करण्यात आली आहे. वैद्यकीय सुविधा, औषधे यांच्यासह फिरती रुग्णवाहिका पालखी मार्गावर उपलब्ध असणार आहे. वैद्यकीय पथकामध्ये स्त्री रोग तज्ञांची नेमणूक देखील करण्यात आली आहे. संत तुकाराम महाराज पालखीसोबत देहू ते पंढरपूरपर्यंत कर्मचाऱ्यांसह अग्निशामक वाहन, पिण्याच्या पाण्याचे टँकर दिले जाणार आहेत. महापालिकेच्या वतीने सेवासुविधांमध्ये कमतरता राहणार नाही याची पुरेपूर काळजी घेऊन यंदाची वारी आनंदी वातावरणात पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासन सर्वोतपरी प्रयत्न करेल, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

# सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे राजकारण



भाष्य

नितीन सावंत
91 9892514124



वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या गेल्याच आठवड्यात झाल्या. या बदल्यांवरून आता नव्या राजकारणाला सुरुवात झाली आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी यांना मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी जायचे होते परंतु त्यांचा नेम चुकला असून एमएमआरडीएच्या आयुक्तपदी त्यांना संधी मिळाली आहे. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालक पदी अनिल डिग्गीकर यांची वर्णी लागली आहे यापूर्वी ते म्हाडाचे उपाध्यक्ष होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खास मर्जीतील संजीव जयस्वाल यांची अपेक्षाप्रमाणे म्हाडाचे उपाध्यक्ष म्हणून बदली झाली आहे. ठाणे महापालिकेत आयुक्त असताना त्यांची मर्जी संपादन करून एका क्लार्कने सहाय्यक महापालिका आयुक्तपदी आपली वर्णी लावून घेतली होती. त्यानंतर हा सहाय्यक आयुक्त मोकाट सुटला होता. ठाणे महापालिकेत हा स्वतःला सुपर आयुक्त समजत होता परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी या सहाय्यक आयुक्ताला चांगले वठणी वर आणले. पुढे हे जयस्वाल मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी गेले. पण तेथे उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांची मर्जी संपादन करू न शकल्याने ते अडगळीत गेले. पुढे त्यांना पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाचे सचिव म्हणून नेण्यात आले. त्याचवेळी त्यांना म्हाडाचे उपाध्यक्षपद पाहिजे होते परंतु पर्यावरण सचिव पदावर असलेले अनिल डिग्गीकर यांची म्हाडाच्या उपाध्यक्षपदी वर्णी लागली. परंतु सरकार बदलल्यानंतर त्यांनी या पदावर जाण्यासाठी आपले देव पाण्यात बुडवून ठेवले होते. अखेर सरकार बदलल्याने आणि गृहनिर्माण खाते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्याने त्यांना म्हाडाचे उपाध्यक्ष पद सहज मिळाले आहे. कोरोना काळात ठाण्याच्या महापालिका आयुक्तपदी आलेले डॉक्टर विपिन शर्मा यांची गाडीही थोडक्यात चुकली आहे. सुरुवातीला त्यांना नगरविकास विभाग(२) चे सचिव पद मिळाले होते. परंतु 24 तासाचा तासात त्यांची बदली रद्द होऊन त्यांना एम एम आर डी ए चे अतिरिक्त महानगर आयुक्त म्हणून पाठवले गेले आहे. त्यांच्या जागी एच गोविंदराज हे आले आहेत. यापूर्वी या विभागाच्या सचिव पदी असलेल्या सोनिया सेठी या प्रामाणिक आणि सरळ स्वभावाच्या समजल्या जातात. परंतु दोन वर्ष पूर्ण होण्याआधीच त्यांना या विभागाच्या सचिव पदावरून का हटवले गेले याची चर्चा मंत्रालयात सुरू आहे. मुंबई मेट्रो वन लवकरात लवकर सुरू करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ज्येष्ठ सनदी अधिकारी मनीषा म्हैसकर यांच्याकडे फारसा मोठा विभाग नव्हता फक्त राज्य शिष्टाचार विभागाच्या त्या चीफ प्रोटोकॉल ऑफिसर होत्या आता त्यांना सार्वजनिक बांधकाम खाते मिळाले आहे. नगर विकास विभागाच्या सचिव सोनिया सेठी यांनी आपल्या पदाचा कार्यभार त्वरित सोडला त्यांची एम एम आर डी ए च्या आयुक्तपदी वर्णी लागेल, अशी शक्यता होती परंतु अचानक चक्रे कशी फिरली हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे दोघेच सांगू शकतात. सध्या ज्येष्ठ सनदी अधिकारी नितीन करीर यांच्याकडे वित्त आणि महसूल या दोन खात्यांचा कार्यभार आहे यापैकी महसूल खाते सोनिया सेठी यांना मिळेल अशी चर्चा आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा शिक्का असलेल्या नितीन करीर यांना मुंबई महानगरपालिका आयुक्त पद मिळणार नाही हे मागेच निश्चित झाले आहे परंतु अजूनही त्यांनी आपले प्रयत्न सोडलेले नाहीत. SRA चे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे यांना एक वर्षाची मुदतवाढ मिळाली आहे. ही मुदतवाढही लवकरच संपेल. महाविकास आघाडीच्या काळात नियुक्त झालेले सतीश लोखंडे हे सरळ अधिकारी समजले जातात. त्यामुळेच फडणवीस यांनी त्यांना मुदतवाढ दिली.त्यांच्या जागी कोण येणार?याचीही उत्सुकता राजकीय वर्तुळात आहे. महापालिका आयुक्तपदी कोण? महापालिका आयुक्त इक्बाल सिंग चहल यांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. त्यांच्या जागी कोण येणार याचीही चर्चा सुरू झाली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी वर्णी लागल्यानंतर मी फक्त उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे या दोघांचेच फोन घेतो. बाकी कुणाचे फोन घेत नाही अशी चहल करत असत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यावेळी नगर विकास मंत्री होते त्यांचेही फोन घेत नसत परंतु सत्ता बदल झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्र्यांशी जमवून घेतले. देवेंद्र फडणवीस विरोधी पक्ष नेते असतानाच त्यांचे आणि चहल यांचे संबंध सौहार्दाचे होते. त्या संबंधाचा उपयोग चहल यांना सत्ता पालट झाल्यानंतर झाला. परंतु आता महापालिका आयुक्तांची बदली निश्चित आहे. मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी यांचे नाव आयुक्त पदासाठी चर्चेत आहे.

## संपादकीय »

### कुलगुरूंचीच परीक्षा!

***मुंबई विद्यापीठाची सूत्रे घेणारे डॉ. रवींद्र कुलकर्णी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी विराजमान होणारे डॉ. सुरेश गोसावी हे दोघेही उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गेल्या तीन दशकांपासून आहेत.***

उच्च शिक्षणसंस्थांच्या राष्ट्रीय क्रमवारीत महाराष्ट्राची पीछेहाट झाल्याचा अहवाल जारी झाल्यानंतर लगेचच राज्यातील मुंबई आणि पुणे येथील विद्यापीठांना कुलगुरू मिळणे हा योगायोग असेलही; पण यामुळे आपल्या समोरील अवघड आव्हानांची कल्पना नूतन कुलगुरूंना आली असेल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्षभर हंगामी नेतृत्वाखाली होते, तर मुंबई विद्यापीठाला आठ महिने कुलगुरू नव्हते. जिल्हा परिषदा वा महापालिका यांच्याप्रमाणे विद्यापीठांकडेही सत्तेचे स्थान म्हणून राजकीय पक्ष पाहू लागल्याने आणि त्यातून अधिकार मंडळांवर राजकीय नेमणुका होऊ लागल्याने विद्यापीठे राजकीय आखाडे बनत आहेत. राज्यातील ही दोन प्रमुख विद्यापीठे काही काळ नेतृत्वहीन राहण्यामागचे खरे कारण या राजकारणातच आहे. विद्यापीठांत राजकीय हस्तक्षेप होणार नाही, यासाठी नूतन कुलगुरूंनी ठाम भूमिका घ्यायला हवी.

**गेम डिझाइनिंग ॲण्ड डेव्हलपर क्षेत्रात करा करिअर करण्याची चांगली संधी आहे. या क्षेत्रात काम करुन तुम्ही स्वत:च्या क्रिएटिव्हिटीच्या जोरावर महिन्याला लाखो रुपये कमावू शकता. यासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता, मिळणारा पगाक, शिक्षण देणाऱ्या संस्थांचा तपशील देण्यात आला आहे.**

## गेम डिझाइनिंग आणि डेव्हलपर क्षेत्रात करिअर



आता प्रत्येक काम कॉम्प्युटर, मोबाईल आणि विविध तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होते म्हणून आजच्या काळाला डिजिटल युग म्हटले जाते. या डिजिटायझेशनमुळे खेळ आणि खेळण्याची पद्धतही बदलली आहे. पूर्वी मुलं मित्रांसोबत रस्त्यावर किंवा घराबाहेर पार्कमध्ये गेम खेळायचे पण आजच्या काळातील मुलं मित्रांसोबत घरी बसून स्मार्टफोन, लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर सीओडी, जीटीए, फिफा, पब्जी किंवा डोटा सारखे गेम खेळत असतात. मोबाईल किंवा कॉम्प्युटरवर गेम खेळण्याच्या या तंत्राला डिजिटल गेमिंग म्हणतात. डिजिटल गेमिंग खेळणाऱ्यांची संख्या जगभरात वाढतेय. म्हणूनच डिजिटल गेमिंग क्षेत्रात चांगले करिअर करण्याची संधी आहे. यासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता, अनुभव याची सविस्तर माहिती जाणून घ्या.

गेम डिझायनिंगमध्ये सर्टिफिकेट लेव्हल कोर्स करण्यासाठी तुम्ही दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तर डिप्लोमा आणि ग्रॅज्युएट लेव्हल कोर्स करण्यासाठी तुम्ही बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी, तुमच्याकडे कोणत्याही टेक्निकल क्षेत्रातील पदवी असणे आवश्यक आहे.

गेमिंग इंडस्ट्रीत येण्यासाठी आजच्या काळात अनेक कोर्सेस आहेत. यातून तुम्ही तुमच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडू शकता. सर्टिफिकेट लेव्हल कोर्सेस करायचे असतील तर गेमिंगमधील सर्टिफिकेट कोर्सेस, गेम आर्ट आणि डिझाइनमधील सर्टिफिकेट कोर्सेस उपलब्ध आहेत. डिप्लोमासाठी डिप्लोमा इन गेम डिझाईन आणि इंटिग्रेशन, प्रोफेशनल डिप्लोमा इन गेम आर्ट, डिप्लोमा इन ॲनिमेशन, गेमिंग आणि स्पेशल इफेक्ट्स, ॲडव्हान्स्ड डिप्लोमा इन गेम आर्ट आणि थ्रीडी गेम कंटेंट क्रिएशन यासारखे कोर्स करता येऊ शकतात.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ।।१।।
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ।।२।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोसमी वारे केरळात!

## 13 जूनपर्यंत कोकणात: हवामान विभागाने वर्तविला अंदाज

।पुणे । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मोठ्या प्रतीक्षेनंतर नैऋत्य मोसमी वारे केरळमध्ये गुरुवारी दाखल झाले. मोसमी वाऱ्यांच्या वाटचालीस पोषक स्थिती निर्माण झाल्यामुळे पुढील ४८ तासांत कर्नाटकात आणि मंगळवार, १३ जूनपर्यंत कोकणात पाऊस दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मात्र अरबी समुद्रातील 'बिपरजॉय' चक्रीवादळामुळे पावसाचा जोर कमी आहे.**



साधारणतः १ जून रोजी मोसमी वारे केरळमार्गे भारताच्या मुख्य भूमीमध्ये दाखल होतात. यंदा ४ जूनपर्यंत पाऊस येईल, असा अंदाज होता. त्यानंतरही चार दिवसांच्या विलंबाने आलेल्या मोसमी पावसाने केरळचा ७५ टक्के आणि तमिळनाडूचा ३५ टक्के भाग व्यापल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. 'स्काय मेट' या खासगी हवामान संस्थेने ७ जूनपर्यंत पाऊस दाखल होण्याचा अंदाज वर्तविला होता. वाऱ्याच्या वाटचालीस पोषक स्थिती असल्यामुळे पुढील ४८ तासांत वारे कर्नाटकपर्यंत मजल मारतील. त्यानंतर गोव्यात ११ जून आणि १३ जूनपर्यंत कोकणात मोसमी पाऊस पडेल, असे हवामान शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी सांगितले.

### राज्यात आज पूर्वमोसमी पावसाची शक्यता

**राज्यात मोसमी पाऊस दाखल होण्याआधी पूर्वमोसमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. शुक्रवारी राज्यभरात पाऊस पडेल, अशी शक्यता आहे. गुरुवारी वर्धा येथे सर्वाधिक ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. महाबळेश्वरमध्ये सर्वात कमी १८.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. पूर्वमोसमी पाऊस झाल्यास उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.**

---

# "२०२४ च्या निवडणुकांची तयारी"

## राज्यातल्या तणावावरून काँग्रेसची नरेंद्र मोदींवर टीका

। लखनऊ ।महाईन्यूज

**राज्यात अलिकडच्या काळात लहान-मोठ्या दंगली घडत आहेत. गेल्या महिन्यात छत्रपती संभाजी नगरमध्ये, अकोल्यात दंगली घडल्या. त्यापाठोपाठ या महिन्यात दोन दिवसांपूर्वी अहमदनगरमध्ये एका उरूसाच्या मिरवणुकीत काही तरुणांनी मुघल बादशाह औरंगजेबाचे पोस्टर्स हातात घेऊन नाच केला, तसेच घोषणाबाजी देखील केली. त्यापाठोपाठ कोल्हापुरातही असाच काहिसा प्रकार घडला.**

काही तरुणांनी औरंगजेबाचे फोटो सोशल मीडिया अकाऊंटच्या स्टेटसवर ठेवले, तसेच औरंगजेबाचं उदात्तीकरण करणारा मजकूरही शेअर केल्याने या लोकांवर कारवाई करावी अशी मागणी हिंदुत्त्ववादी संघटनांनी केली. या मागणीसाठी बुधवारी कोल्हापूर बंदची हाक दिली. कोल्हापुरात हिंदुत्त्ववादी संघटनांनी ठिय्या आंदोलनही केलं. परंतु काही ठिकाणी आंदोलन हिंसक झाल्याने पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला. या सर्व घटनांवरून राज्यातले सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टीका करत आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्रा वाघ यांनी या दोन्ही घटनांवरून महाविकास आघाडीकडे बोट दाखवलं आहे. चित्रा वाघ यांनी एक ट्वीट केलं आहे. त्यात त्यांनी म्हटलं आहे की, राज्यात अचानक औरंग्याच्या औलादी वाढू लागल्या आहेत. त्यांना जन्माला घालणाऱ्यांचा म्हणजेच महाविकास आघाडीचा आणि औरंगजेबाचा डीएनए एकच असावा. अन्यथा काही तरुणांनी औरंगजेबाचं स्टेटस ठेवल्याप्रकरणी राज्यातील सर्व परिस्थिती संवेदनशील असताना महाविकास आघाडीच्या वाचाळवीरांकडून दंगे भडकवण्याचं काम झालं नसतं.

यानंतर आता काँग्रेसने या घटनांसाठी भारतीय जनता पार्टीला जबाबदार धरलं आहे. माजी मंत्री आणि काँग्रेस आमदार यशोमती ठाकूर यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला आहे. ठाकूर यांनी एक ट्वीट केलं आहे. त्यात त्यांनी म्हटलं आहे की, "जातीय – धार्मिक विद्वेष वाढणं हे मोदींचे अपयश! हिंदू धर्म खतरें में हैं (हिंदू धर्म धोक्यात आहे) ची भीती दाखवून २०२४ च्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. जनसामान्यांनी या षडयंत्राला बळी पडू नये. महाराष्ट्राची औद्योगिक सुरक्षा धोक्यात आणली जात आहे." दरम्यान आमदार ठाकूर यांनी राज्यातल्या जनतेला आवाहन केलं आहे की, "या षडयंत्रापासून लांब राहा, तुम्हाला छत्रपती शिवरायांची शपथ आहे." काँग्रेसने ५० वर्षांपूर्वी गरिबी हटवण्याची हमी दिली होती, मात्र, त्यांनीच गरिबांचा सर्वात मोठा विश्वासघात केला. गरिबांची दिशाभूल करणे, गरिबां ना टाळकळत ठेवणे ही काँग्रेसची रणनीती आहे. काँग्रेसच्या या धोरणाचा फटका राजस्थानच्या जनतेलाही बसला आहे.



### काँग्रेस रिमोटने चारणारा पक्ष

**2014 पूर्वी देशात काय परिस्थिती होती? 2014 पूर्वी भ्रष्टाचाराविरोधात लोक रस्त्यावर उतरले होते, मोठ्या शहरांमध्ये दररोज दहशतवादी हल्ले व्हायचे. काँग्रेसचे सरकार रिमोट कंट्रोलने चालत होते असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर केला आहे. ते आज राजस्थानमध्ये एका सभेत बोलत होते.**

---

## दोन्ही निवडणुका स्वबळावर लढण्याची भाजपची तयारी



।मुंबई ।महाईन्यूज

आगामी लोकसभा आणि विधानसभेची निवडणूक युती म्हणून एकत्र लढविणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने देत असले तरी प्रत्यक्षात भाजपने मात्र दोन्ही निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केल्याचे दिसत आहे. राज्यातील ४८ लोकसभा आणि २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक प्रमुख घोषित करून भाजपने गुरुवारी ऐनवेळी स्वबळावर निवडणुका लढण्याची वेळ आली, तर आधीच तयारी करून ठेवली असल्याचे बोलले जात आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड करून राज्यात भाजपसोबत सरकार स्थापन केले. सरकारच्या स्थापनेपासून शिंदे आणि फडणवीस हे भाजप-शिवसेना (शिंदे गट) राज्यातील सर्व निवडणुका युती म्हणून लढविणार असल्याचे सांगत आहेत. एकीकडे एकत्र निवडणुका लढविण्याचा निर्धार व्यक्त केला जात असताना दुसरीकडे मात्र भाजपने ४८ लोकसभा मतदारसंघांमध्ये केंद्रीय मंत्र्यांचे दौरे आयोजित करून वातावरण निर्मिती चालवली आहे. त्यात आता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक प्रमुख घोषित करून पक्षाने स्वबळावर लढण्याची तयारी केल्याचे स्पष्ट संकेत दिले. मात्र, त्याचवेळी 'आम्ही आगामी सर्व निवडणुका युतीत लढविणार असल्याने आमचे निवडणूक प्रमुख शिवसेनेसाठीही काम करणार आहेत', असे स्पष्ट केले. 'पक्षाने नियुक्त केलेले निवडणूक प्रमुख भाजपबरोबरच शिवसेनेच्या उमेदवारांनाही सहकार्य करणार आहेत', असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# बॉलिवूडमधल्या राजकारणावर स्पष्टच बोलल्या, श्रद्धा आणि तारा



मुंबई: 'आलिया भटकडे असं कोणती गोष्ट आहे जी तुझ्याकडे नाही,' असा प्रश्न गप्पांच्या कार्यक्रमात निर्माता-दिग्दर्शक करण जोहरनं अभिनेत्री श्रद्धा कपूरला विचारला आणि त्यावर श्रद्धानं 'तू नाहीयेस,' असं उत्तर दिलं. तिच्या या उत्तरानं बॉलिवूडमधलं ग्रुपिझम आणि गुणवत्तेपेक्षाही तुमच्यासाठी कुणी एक 'गॉडफादर' असणं किती गरजेचं आहे, हे दाखवून दिलं. श्रद्धाच्या करिअरला आठ-दहा वर्षांचा कालावधी उलटला असला, तरी गेल्या दोन-चार वर्षांत पदार्पण करणाऱ्या अभिनेत्रींनीही बॉलिवूडमधल्या राजकारणावर भाष्य केल्यानं त्याचीच सध्या चर्चा आहे.

'स्टुडंट ऑफ द इयर २' या चित्रपटातून तारा सुतारियाचं बॉलिवूडमध्ये पदार्पण झालं. याच चित्रपटातून अनन्या पांडेही बॉलिवूडमध्ये दाखल झाली. निर्मिती करण जोहरच्या संस्थेची असल्यानं करण आणि या चित्रपटावरही नेपोटिझमला पाठिंबा दिल्याची टीका झाली. मात्र, पुढच्या दोन-चार वर्षांतही तारा आणि अनन्याच्या वाट्याला इतर मोठ्या संस्थांचे बिग बजेट चित्रपट आले नाहीत. तारालाही चांगल्या भूमिका मिळवण्यासाठी झगडावं लागतंय.

या दोघींच्या अभिनयक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झालं असलं, तरी सिद्ध करण्याची संधीच मिळाली नाही, तर चांगलं-वाईट आधीच कसं ठरवणार, असं या दोघींचं म्हणणं आहे. श्रद्धा कपूरनंही 'आशिकी २', 'हसीना', 'हाफ गर्लफ्रेंड' ते अलीकडच्या 'तू झूठी मैं मक्कार'पर्यंत अनेक हिट चित्रपट दिले. मात्र, मोठ्या निर्मितीसंस्थेच्या कलाकृतीत ती आजवर झळकलेली नाही. अभिनय, सौंदर्य आणि नृत्य या सगळ्याचा मिलाफ असूनही ती बॉलिवूडमधल्या ग्रुपिझममुळे मागे पडल्याचं तिनं मध्यंतरी सांगायचा प्रयत्न केला. हीच गोष्ट दिशा पटनीची. उत्तम ॲथलिट व्यक्तीमत्त्व आणि सौंदर्य असूनही दिशाच्या वाट्याला फारसे चित्रपट आले नाहीत.

# मुन्नाभाई MBBS सिनेमा केला पण, त्यावेळी मी इतकी भोळी होते, मला समजलंच नाही की:प्रिया बापट

मुंबई: मराठमोळी अभिनेत्री प्रिया बापट सध्या सिटी ऑफ ड्रिम्स या सीरिजमुळं चर्चेत आली आहे. या हिंदी सीरिजमध्ये ती मुख्य भूमिकेत आहे. हिंदी फिल्म इंडस्ट्रीत मुख्य भूमिका मिळवण्यासाठी तिला कित्येक वर्ष वाट पाहावी लागली, असं तिनं एका मुलाखतीत म्हटलं आहे.

म्हातारीच्या भूमिकेतून रंगभूमीवर पदार्पण करणाऱ्या प्रियानं 'गुड मॉर्निंग' करत प्रेक्षकांच्या मनात घर केलं. हिंदी 'मुन्नाभाई'मध्ये ती चमकली. पुढं काही मालिका, 'मी शिवाजीराजे...', 'आनंदी आनंद', 'टाइम प्लीज', 'काकस्पर्श'सारखे सिनेमे तिने केले. पण मुन्नाभाई MBBS आणि लगे रहो मुन्नाभाई या चित्रपटातल्या तिच्या भूमिका छोट्या असल्या तरी लक्षवेधी ठरल्या होत्या. आई म्हणाली नोकरी शोध आता, श्रेयस आणि जितेंद्र जोशी स्वामी समर्थांच्या मठात गेले आणि...कधीही न ऐकलेला किस्सा



मुन्नाभाई चित्रपटाबद्दल बोलताना ती म्हणते की, तो चित्रपट तिला अगदी सहज मिळाला. राजकुमार हिरानी यांच्या ऑफिसमधूनल तिला फोन आला.ऑडिशन दिलं आणि तिला तो रोल मिळाला...इतकं सोपं होतं ते. चित्रपटासाठी शूटिंग केल्यानंतरही तिला समजलं नव्हतं की, हा चित्रपट किती मोठा आहे. ती म्हणाली की, मी इतकी भोळी होते की, मला कळालंच नव्हतं की, मी शूटिंग करतेय तो इतका मोठा चित्रपट आहे. संजय दत्त आहे.. राजकुमार हिरानी आहेत...विशेष काय वाटायचं नाही. पण जेव्हा मी या चित्रपटाच्या प्रिमियरला गेले तेव्हा समजलं की, हा किती मोठा सिनेमा आहे. तेव्हा मी स्वत:वरच खूष झाले होते. दरम्यान, सिटी ऑफ ड्रिम्सच्या पहिल्या सीझनमध्ये प्रियाचा बोल्ड सीन व्हायरल झाला होता. हा लेस्बियन सीन व्हायरल झाल्यानंतर तिची अवस्था कशी झाली होती, हे सांगताना ती म्हणाली की, तेव्हा तो एकच सीन व्हायरल झाला आणि नंतरचे एक दोन दिवस खूप त्रास झाला. मानसिक त्रासही खूप झाला होता. तो सीन म्हणजे माझ्यासाठी कामाचा एक भाग होता, असं मला वाटत होतं. ती गोष्ट खरं तर एका मिनिटांची होती. पण त्याचीच चर्चा झाली. सीरजमध्ये इतरही चांगल्या गोष्टी होत्या.

# आँखो में तेरी अजब सी अजब सी अदाये है !



परिकथेतील राजकुमारी प्रमाणे ती लोभसवाणी असली तरी तिच्या कारकिर्दीसोबतच वैयक्तिक जीवनाचा आलेख तेवढा सरळसोट नाही. तिला अनेक भावनिक- मानसिक संघर्षांतून जावे लागले आहे. वेगवेगळ्या कारणांवरून तिच्याबद्दल होणाऱ्या चर्चा तर तिच्या पाचवीला पुजलेल्या आहेत. सुरवातीच्या काळामध्ये सिद्धार्थ माल्यासोबत असलेली तिची मैत्री, रणबीर कपूरच्या प्रेमात तिने मानेवर गोंदवलेला 'आर के' चा टॅटू, 'पद्मावत' चित्रपटादरम्यान तिला मिळालेल्या धमक्या, क्लेव्हज कॉंट्रोव्हर्सी, तिने जे. एन. यु. ला दिलेली भेट, रणवीर सिंग सोबतच तिचं प्रेम प्रकरण व नंतर झालेला विवाह... आणि आता आगामी 'पठाण' चित्रपटामध्ये तिने परिधान केलेली भगव्या रंगाची बिकिनी !... पण तरीही आज तरी दीपिका पादुकोण भारतीय सिनेसृष्टीतील ध्रुवपदावर विराजमान आहे. दीपिका आज तिच्या वयाची ३७ वर्षे पूर्ण करत आहे. गेल्या सोळा वर्षांत तिच्या नावावर फक्त तीस चित्रपट आहेत. चित्रपटांसाठी सर्वाधिक मानधन घेणारी भारतीय सिनेसृष्टीमधील आघाडीची अभिनेत्री आहे. दीपिकाचे वडील प्रकाश पादुकोण हे प्रसिद्ध बॅडमिंटन खेळाडू होते हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे आपणही वडिलांप्रमाणे बॅडमिंटन खेळाडू व्हावे असे दीपिकाला लहानपणापासून वाटले होते.

# अमृता खानविलकरचा स्टायलिश लूक चर्चेत...

मराठमोळी अभिनेत्री अमृता खानविलकर वारंवार तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते.नुकत्याच मागील काही महिन्यांपूर्वी अमृताचा बहुचर्चित 'चंद्रमुखी' चित्रपट प्रदर्शित झाला होता, या चित्रपटातील तिच्या नृत्याने आणि अभिनयाने साऱ्यांचेच लक्ष वेधून घेतले. या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. तसेच या चित्रपटातील चंद्रा आणि दौलतच्या प्रेमकथेला चाहत्यांती पसंती देखील मिळाली. चित्रपटांबरोबरच अमृता सोशल मीडियावरही सक्रीय असते. सोशल मीडियावर नवनवीन फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते.



# 'राम तेरी गंगा मैली'मध्ये दिसली असती मराठमोळी अभिनेत्री



बॉलिवूडच्या ज्येष्ठ अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये अनेक उत्तमोत्तम सिनेमांमध्ये काम केले आहे. त्यांनी अनेक उत्कृष्ट चित्रपटांमध्ये तर अनेक प्रसिद्ध कलाकारांसोबत काम केले असून काही वर्षांपूर्वी त्यांनी ETIMES शी बोलताना 'राम तेरी गंगा मैली' या सिनेमाबाबत एक मोठा उलगडा केला होता. या सिनेमातील एका सीनमुळे पद्मिनी यांनी 'राम तेरी गंगा मैली' चित्रपटाची ऑफर नाकारल्याचे अभिनेत्रीने सांगितले. त्या काळी हिट झालेला हा चित्रपट न केल्याचा काहीसा पश्चाताप त्यांना आहे. 'राम तेरी गंगा मैली' हा चित्रपट राज कपूर यांनी दिग्दर्शित केला होता, त्यामध्ये मंदाकिनी यांनी महत्त्वाची भूमिका साकारली होती.

पद्मिनी कोल्हापुरे यांनी या मुलाखतीत सांगितले की, त्यांना राज कपूर यांनी 'राम तेरी गंगा मैली' चित्रपटाची ऑफर दिली होती, परंतु या सिनेमात असणाऱ्या किसिंग सीनमुळे त्यांनी ती ऑफर नाकारली होती. त्यानंतर या चित्रपटात या भूमिकेसाठी मंदाकिनीला कास्ट करण्यात आले. पद्मिनी कोल्हापुरे यांच्या म्हणण्यानुसार, राज कपूर यांनी मंदाकिनी यांच्यासोबत ४५ दिवसांचे शूटिंग पूर्णही केलेले, तरी देखील ते पुन्हा या भूमिकेत पद्मिनी यांना कास्ट करण्यासाठी तयार होते. पद्मिनी पुढे म्हणाल्या की, 'मला 'एक दुजे के लिए' या चित्रपटात रती अग्निहोत्रीची भूमिका, सिलसिला चित्रपटातील रेखाची भूमिका आणि तोहफा चित्रपटातील श्रीदेवीची भूमिका ऑफर करण्यात आली होती, पण या भूमिका मी काही कारणास्तव करू शकले नाही.

# टीम इंडियाची स्थिती दयनीय!

## WTC फायनलमध्ये, दोन दिवसांच्या खेळानंतर ऑस्ट्रेलियाची सामन्यावर मजबूत पकड

। लंडन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।




धोनीचा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये टीम इंडियाची अवस्था दयनीय दिसत आहे. दोन दिवसांच्या खेळानंतर भारतीय संघ ३१८ धावांनी पिछाडीवर असून भारताच्या ५ विकेट्सही पडल्या आहेत. ऑस्ट्रेलियाच्या प्रचंड धावसंख्येसमोर निम्मा भारतीय संघ पॅव्हेलियनमध्ये परतला आहे. नाबाद फलंदाज स्टीव्ह स्मिथने (१२१ धावा, २६८ चेंडू, १९ चौकार) सलग दुसऱ्या दिवशी आपले शतक पूर्ण केले, तर ट्रॅव्हिस हेडने दीडशेच्या (१६३ धावा, १७४ चेंडू, २५ चौकार, १ षटकार) पुढे मजल मारली. या दोघांनाही दुसऱ्या दिवशीही मॅरेथॉन डाव खेळता आला नाही ही दिलासादायक बाब होती. असे असतानाही ऑस्ट्रेलियन संघ ४६९ धावांपर्यंत मजल मारण्यात यशस्वी ठरला. प्रत्युत्तरादाखल खेळताना भारतीय संघाने केवळ १५१ धावांत पाच विकेट गमावल्या होत्या. अजिंक्य रहाणे २९ धावा (७१ चेंडू) आणि श्रीकर भरत ५ धावांवर (१४ चेंडू) खेळत होते.

स्मिथ आणि हेड असताना ज्या खेळपट्टीवर फलंदाजी सोपी होती, त्याच खेळपट्टीवर भारतीय फलंदाजांना संघर्ष करावा लागला. रोहित शर्मा (१५ धावा) आणि शुभन गिल (१३ धावा) यांनी पहिल्या सहा षटकात ३० धावांची भर घालत भारताची सकारात्मक सुरुवात केली. मात्र, दोघेही समान धावसंख्येवर बाद झाले. गिलने स्कॉट बोलँडचा एक आत येणारा समजला नसल्याने तो सोडून दिला. चेंडू त्याच्या स्टंपच्या पलीकडे गेला. त्या चेंडूने स्टंप उडवले. अशाच प्रकारे चेतेश्वर पुजाराही (१४ धावा) कॅमेरून ग्रीनचा बळी ठरला. ऑस्ट्रेलियाच्या संयमी गोलंदाजीसमोर विराट कोहली (१४ धावा) ही फार काळ टिकू शकला नाही. भारताकडून फक्त रवींद्र जडेजाने (४८ धावा, ५१ चेंडू) प्रतिआक्रमण केले. त्याने आपल्या खेळीत सात चौकार आणि एक षटकार लगावला.

टीम इंडियाची पहिल्या डावातील सुरुवात काही खास नव्हती. आघाडीची फळी कोलमडल्यानंतर रवींद्र जडेजा आणि अजिंक्य रहाणे यांनी डाव सांभाळण्याचे काम नक्कीच केले, पण दिवसअखेर ऑस्ट्रेलियाने भारतीय संघाला ५ विकेट्स घेऊन बॅकफूटवर ढकलले आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ४६९ धावा केल्या होत्या. याला प्रत्युत्तर देताना टीम इंडियाला केवळ १५१ धावा करता आल्या असून भारतीय संघ अजूनही ३१८ धावांनी मागे आहे. अशा परिस्थितीत अजिंक्य रहाणे आणि केएस इंडियाला तिसऱ्या दिवशी सावधपणे खेळावे लागेल, जेणेकरून ते ऑस्ट्रेलियाला आव्हान देण्याच्या स्थितीत येऊ शकतील.

### 87 वर्षे जुना विक्रम मोडला

पहिल्या दिवशी स्मिथ ९५ धावांवर नाबाद होता. मोहम्मद सिराजने टाकलेल्या दिवसाच्या पहिल्याच षटकात सलग दोन चेंडूंवर चौकार मारून त्याने आपले ३१ वे कसोटी शतक पूर्ण केले. मोहम्मद शमीच्या चेंडूवर चौकार मारून हेडने कारकिर्दीत चौथ्यांदा कसोटीत १५० धावांचा टप्पा गाठला. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत स्मिथ आणि हेड जोडीने २५१* धावांची भागीदारी केली होती.

### 67 षटकात 285 धावांची भागीदारी

दुसऱ्या दिवशी त्यांची भागीदारी २६७ धावांपर्यंत पोहोचली तेव्हा नवा विक्रम रचला. स्मिथ आणि हेड या जोडीने ओव्हलवर चौथ्या विकेटसाठी सर्वाधिक भागीदारीचा ८७ वर्षे जुना विक्रम मोडीत काढला. इंग्लंडच्या वॅली हॅमंड आणि थॉमस वर्थिंग्टन यांनी १९३६ मध्ये ओव्हल येथे भारताविरुद्ध चौथ्या विकेटसाठी २६६ धावांची भागीदारी केली होती. स्मिथ आणि हेड जोडीने ६७ षटकात २८५ धावांची भागीदारी केली.

# मेस्सीला ४४ कोटी डॉलर देण्याची तयारी; सौदीत रोनाल्डो विरुद्ध संघर्ष होण्याची शक्यता!

## मेस्सी आणि सौदीतील अल्-हिलाल क्लबमधील चर्चा अंतिम टप्प्यात

। रियाध।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

वर्ल्ड कप फुटबॉल स्पर्धा संपल्यावर ख्रिस्तियानो रोनाल्डोने सौदी अरेबियातील अल्-नासेर क्लबकडून खेळण्यास सुरुवात केली. आता लिओनेल मेस्सी सध्याच्या मोसमाची सांगता झाल्यानंतर सौदीतील क्लबकडून खेळण्याची शक्यता आहे. त्याबाबत मेस्सी आणि सौदीतील अल्-हिलाल क्लबमधील चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे समजते. त्यांनी मेस्सीला सुमारे ४४ कोटी डॉलर देण्याची तयारी दाखवली असल्याचे समजते.




पीएसजीने मेस्सीला दोन आठवड्यांसाठी बडतर्फ केले आहे. त्याचबरोबर त्याच्यासह नव्याने करार करण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. ला लीगा अर्थात स्पॅनिश लीगने बार्सिलोनावर घातलेल्या निर्बंधामुळे मेस्सी त्याला घडवलेल्या क्लबकडे परतू शकणार नाही असे समजते. फुटबॉल कारकीर्द अंतिम टप्प्यात असलेला मेस्सी सौदीतील क्लबकडून खेळण्यास तयार असल्याचे समजते. रोनाल्डोला अल्-नासेर क्लबने डिसेंबरमध्ये करारबद्ध केले. त्या वेळी त्याला प्रतिवर्षी २२ कोटी डॉलर दिल्याचे वृत्त होते. या करारामुळे रोनाल्डो जगातील सर्वाधिक मानधन मिळालेला क्रीडापटू झाला होता. आता अल्-नासेरचे पारंपारीक प्रतिस्पर्धी अल-हिलाल मेस्सीला करारबद्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांनी मेस्सीला रोनाल्डोपेक्षा जास्त रक्कम देण्याची तयारी दाखवली आहे. मेस्सीला या करारामुळे ४४ कोटी २० लाख डॉलर मिळण्याची शक्यता असल्याचा अंदाज ब्रिटनमधील 'डेली टेलिग्राफ'ने वर्तवला आहे. गेल्याच आठवड्यात अल्-हिलालने अल्-नासेरचा पराभव केला होता. अल्-नासेरच्या पराभवानंतर अल्-हिलालच्या चाहत्यांनी मेस्सी... मेस्सी असा गजर केला होता. दरम्यान, मेस्सीबरोबरील फेरकराराबाबतच्या प्रश्नावर पीएसजीने मौन बाळगले आहे.

# नोव्हाक जोकोव्हिचने जिंकले विक्रमी २२ वे ग्रँडस्लॅम जेतेपद!

।मेलबर्न।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



ऑस्ट्रेलिया ओपनमधील अंतिम सामना आज नोव्हाक जोकोविच आणि स्टेफानोस सित्सिपास यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात सर्बियाचा अनुभवी टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले आहे. अंतिम फेरीत जोकोविचने ग्रीसच्या स्टेफानोस सित्सिपासचा पराभव केला. जोकोविचने २ तास ५६ मिनिटे चाललेला हा सामना ६-३, ७-६, ७-५ असा जिंकला. या विजयासह जोकोविच एटीपी क्रमवारीत जगातील अव्वल क्रमांकाचा पुरुष खेळाडू बनला आहे.

२४ वर्षीय सित्सिपास अजूनही त्याच्या पहिल्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाच्या प्रतीक्षेत आहे. यापूर्वी तो २०२१ मध्ये फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. तेथेही त्याचा जोकोविचविरुद्ध पराभव झाला. त्यानंतर सित्सिपासने पहिले दोन सेट जिंकले, पण जोकोविचने पुनरागमन करत पुढील तीन सेट जिंकून ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. दोन्ही खेळाडू १३व्यांदा आमनेसामने होते आणि जोकोविचने ११व्यांदा विजय मिळवला आहे.

जागतिक क्रमवारीत सित्सिपास चौथ्या स्थानावर आहे तर जोकोविच पाचव्या स्थानी आहे, पण आपल्याकडील अनुभवाच्या जोरावर जोकोविचने सामन्यात विजय मिळवला.